स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

पीएच.डी. (इतिहास) पदवीसाठी संशोधनाचा

आराखडा

:: संशोधन विषय ::

आधुनिक भारताच्या संविधानिक विकासातील

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची

भूमिका आणि कार्य : एक विश्लेषणात्मक अभ्यास

:: संशोधक ::

भीमराव जळबाजी हाटकर

(एम.ए.,एम.फिल.,एलएल.बी.,डी.सी.ई.,सी.जे.)

:: मार्गदर्शक ::

प्रा.डॉ.सांवत यु.एस.

(एम.ए.एम.फिल.,पीएच.डी.)

प्रपाठक व विभाग प्रमुख (इतिहास)

यशवंत महाविद्यालय, नांदेड

जून 2017

आधुनिक भारताच्या संविधानिक विकासातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर याची भूमिका आणि कार्य: एक विश्लेषणात्मक अभ्यास

प्रस्तावना :-

'इतिहास' हे मानवविद्या अभ्यास शाखेतील एक महत्वाचे प्रमुख शास्त्र आहे. इतिहासाचे स्वरुप खूपच व्यापक आहे. इतिहासाचे सर्वसामान्यपणे सामाजिक इतिहास, धार्मिक इतिहास, वैचारिक इतिहास, राजनैतिक इतिहास, संविधानिक इतिहास, राजकीय इतिहास, सांस्कृतिक इतिहास, वसाहतीचा इतिहास, कायद्याचा इतिहास, लष्कराचा इतिहास, शैक्षणिक इतिहास, आर्थिक इतिहास, असे अनेक प्रकार प्रचलित आहेत. भौगोलिक दृष्टीकोणातून राष्ट्रीय इतिहास, प्रादेशिक इतिहास, जागातिक इतिहास असेही प्रकार पाडता येतात. परंतू या सर्व प्रकारात सर्वात प्रचलित व लोकप्रिय प्रकार म्हणजे देश आणि प्रदेशाचा राजकीय इतिहास हा होय. भारता सारख्या वर्णजाती व्यवस्था असलेल्या देशात धर्माधारित राजेशाही शासन प्रणाली दीर्घकाळ राहिल्यामुळे राजे महाराजांच्या इतिहासाने सर्व रकाने भरलेले आहेत. ब्राह्मण आणि क्षत्रियांनाच राजा होण्याची आणि राज्यव्यवस्था धर्मशास्त्रातील तत्वानुसार चालवण्याची परंपरा असल्याने भारतात घटनात्मक इतिहासाला महत्व प्राप्त झालेले नाही. इंग्रजांची राजवट भारतात प्रस्थापित झाल्यानंतर खऱ्या अर्थाने इथे कायद्याच्या राज्याला सुरुवात झाली.

ईस्ट इंडिया कंपनीच्या वतीने किंग जॉर्ज प्रथम यांनी 24 सप्टेंबर 1726 रोजी चार्टर मंजूर करुन भारतात कायदा आणि न्याय व्यवस्थेची पायाभरणी केली. कंपनीने आपल्या प्रशासकीय सोयीसाठी प्रथमतः बंगाल, मद्रास आणि मुंबई या तीन प्रातांत आपले राजकीय सत्ताकेंद्रे बळकट केले. त्यानंतर 1773 मध्ये रेग्युलेटींग ॲक्ट पास करण्यात आला आणि त्यानुसार 1774 मध्ये कोलकत्ता येथे प्रथमच सर्वोच्च न्यायालयाची सुरुवात झाली.

1857 च्या उठावानंतर कंपनीचे सरकार बरखास्त करुन इंग्लंडच्या साम्राज्याची सत्ता प्रत्यक्ष सुरु झाली. 1858 च्या राणीच्या जाहीरनाम्यापासुन घटनात्मक कार्यवाहीस प्रारंभ झाला. 1909 चा कायदा, 1919 चा कायदा 1935 चा कायदा हे भारताच्या घटनात्मक इतिहासाचे महत्वाचे टप्पे आहेत. भारताचा आधुनिक इतिहास, स्वातंत्र्य आंदोलन, शेतकरी आंदोलन, कामगारांचे लढे, दलित आंदोलने यांनी खचाखच भरलेला आहे. तथापि, विद्यमान शासनप्रणाली व राज्यघटना समजून घ्यायची असेल तर घटनात्मक इतिहासाचा अभ्यास आणि संशोधन अनिवार्य आहे. घटनात्मक तथा संविधानिक इतिहासाच्या माध्यमातून गतकाळातील वाटचाल, प्रशासनाची प्रगती, कायद्याचा विकास, राज्यघटनेच्या निर्मितीची प्रक्रिया समजून घेता येते. संविधानात्मक इतिहास हा इतिहासाचा महत्वपूर्ण असा गाभा आहे. इंग्रजाच्या राजवटीत या देशाच्या घटनात्मक विकासाची पायाभरणी आणि वाढ झाल्यामुळे भारतीय इतिहासकारानी काहीशा पूर्वग्रहाने ही इतिहास शाखा दुर्लक्षित केलेली आहे. तसेच भारताच्या घटनात्मक इतिहासात ज्या राष्ट्रपुरुषांनी आपले योगदान दिले आहे त्यांना देखील इंग्रजांचे हस्तक म्हणून पुर्वग्रहाने इतिहासकारांनी दुर्लक्षिले आहे. विशेषतः डॉ.बाबासाहेब आंबेडकर, तेजबहादूर सप्रु.,बॅ.एम.आर जयकर, चिमनलाल सेटलवाड यांच्या सारख्या घटनात्मक विकासात मोलाचे योगदान दिलेल्या महापुरुषांचे कर्तृत्व अद्याप ही अधोरेखीत झालेले नाही. या बाबत संशोधन होणे गरजेचे आहे या निकडीतूनच 'भारताच्या संविधानिक विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि कार्य:एक विश्लेषणात्मक अभ्यास' हा विषय पीएच.डी.च्या संशोधनासाठी निवडला आहे.

1) समस्या सूत्रन (Formulation of Problem)

स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडातील घटनांना इतिहासात ज्या पद्धतीने महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे त्या तुलनेत संविधानिक विकासाच्या घटनांकडे इतिहासकांराचे दुर्लक्ष झालेले दिसून येते. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धांनी जगात उद्‌भवलेल्या

परिस्थितीने भारताचे स्वातंत्र्य हे निश्चितच केलेले होते, परंतू स्वतंत्र भारतात राज्यकारभारासाठी कोणती घटनात्मक प्रणाली स्वीकारली जाणार आहे.? या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी 1919 ते 1947 अशी 28 वर्षे लागली. भारताच्या घटनात्मक विकासात स्वातंत्र्यकालिन नेत्यांनी विशेषतःगांधी नेहरु, पटेल, आझाद यांनी तितकेसे लक्ष दिल्याचे दिसून येत नाही. भारताच्या घटनात्मक विकासात प्रत्येक टप्प्यावर ज्यानी आस्थापूर्वक दूरदृष्टीने परिश्रम घेतले त्यामध्ये अग्रस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर असून नंतर तेजबहादूर सप्रू. बॅ. जयकर, चिमनलाल सेटलवाड, डॉ.साच्चिदानंद यांचा क्रम लागतो. या सर्वांच्या घटनात्मक कार्याचा अभ्यास करुन त्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची आणि भूमिकेची चिकित्सक मांडणी करण्यासाठी 'आधुनिक भारताच्या सविधानिक विकासात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि कार्य' असे संशोधनाच्या विषयाचे समस्यासूत्रण मांडले आहे. सदर विषयावरील संशोधन हे मूलभूत प्रकारचे व पुनर्विश्लेषणाचे असून त्यामुळे काही नवी माहिती प्रकाशात येईल. नवीन अन्यायार्थ मांडता येईल.

2) संशोधनाची उद्दिष्टये:

प्रस्तावित संशोधनातून पुढील उद्दिष्ट्ये साध्य करता येतील.

1) आधुनिक भारताच्या संविधानातील इतिहासाचा आढावा घेऊन चिकित्सा करणे.

2) सन 1919 ते 1956 या 37 वर्षाच्या कालखंडातील घटनात्मक विकासाच्या घटनाक्रमाची मांडणी करणे व त्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कर्तृत्वाची व भूमिकेची चिकित्सा करणे.

3) भारतीय संविधान निर्मिती पूर्व घडलेल्या घटनात्मक सुधारणा कायद्याचा व त्यांच्या भारतीय संविधानावर पडलेल्या प्रभावाचा चिकित्सात्मक अभ्यास करणे.

4) सन 1909 चा कायदा, सन 1919 चा कायदा व सन 1935 च्या कायद्याचा सुक्ष्मस्तरावर अभ्यास करणे.

5) साऊथबरो समिती (1919), मुडीमन समिती (1924), नेहरु समिती (1928), सायमन कमिशन (1929) यांच्या अहवालाची चिकित्सा करणे.

6) गोलमेज परिषदांचा उद्देश, परिषदांची कार्यवाही, परिषदांबाबत कॉंग्रेस, मुस्लिम लीग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकांचा चिकित्सात्मक अभ्यास करणे.

7) जातीय निवाडा आणि पुणे करार या अनुषंगाने तत्कालिन सामाजिक व राजकीय परिस्थितीचे अन्वेषण करुन महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकांचा चिकित्सात्मक अभ्यास करणे.

8) भारतीय संविधानिक सुधार संयुक्त समिती (1933) च्या कार्यवाहीची तसेच या समिती मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या कार्याची चिकित्सा करणे.

9) भारताच्या संविधान निर्मिती मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिका व कार्याची चिकित्सा करणे.

10) भारतीय संविधानाच्या अंमलबजावणी बाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची राज्य सभेत केलेल्या भाषणांची चिकित्सा करणे.

11) भविष्यामध्ये संविधानातील विकासाची दिशा काय राहणार आहे याचा अंदाज घेणे.

3) संशोधन विषयाची गृहितके (Formation of Hypothesis)

गुड आणि हॉट यानी त्यांच्या 'मेथड इन सोशल रिसर्च ' या ग्रंथात म्हटले आहे की, "गृहित कृत्याशिवाय होणारे सामाजिक शास्त्र शाखेतील संशोधन दिशाहीन ठरते." त्यामुळे समाजशास्त्रातील विविध विद्याशाखांतील संशोधनांसाठी गृहितके अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडतात. गृहीतकात संशोधन समस्येची विधानाच्या स्वरुपात मांडणी केली जाते थोडक्यात संशोधनाच्या विषयाचे ते तत्कालिक पूर्वानुमान असते.

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके मांडण्यात आली आहेत.

1) भारताचा घटनात्मक विकास इंग्राजांच्या काळातच घडून आलेला आहे.

2) भारताच्या संविधानिक इतिहासाची क्रमबद्ध मांडणी करणे आवश्यक आहे.

3) संविधानिक इतिहास ही इतिहासाची मुख्य शाखा आहे.

4) भारताच्या घटनात्मक इतिहासात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मोलाचे योगदान आहे.

5) साऊथबरो कमिशन (1919), मुडीमन समिती (1924) सायमन कमिशन (1929) यांच्या शिफारशीमुळे भारताच्या घटनात्मक विकासात महत्वाचे सहाय्य मिळाले आहे.

6) गोलमेज परिषदांचे आयोजन हे संविधानिक सुधार करण्यासाठी करण्यात आले होते.

7) जातीय निवाड्याने दलितांसाठी दिलेले स्वतंत्र मतदार संघ संयुक्त मतदारसंघापेक्षा जास्त हितकारक होते.

8) पुणे करार दबाव, धमक्या,अशांतता, बैचेनी व कटुतेच्या वातावरणात झाला,होता.

9) भारतीय संविधानिक सुधार संयुक्त समितीच्या शिफारशीवर 1935 चा कायदा तयार झाला आहे.

10) भारतीय संविधानिक सुधार संयुक्त समितीच्या कार्यवाहीत डॉ.बाबासाहेब आंबेडकराचे अमूल्य योगदान आहे.

11) क्रिप्स मिशन, वेव्हल योजना, कॅबिनेट मिशन हया संविधानाचे स्वरुप निश्चित करण्यासाठीच्या योजना आहेत.

12) भारतीय घटना समितीच्या निर्मिती मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची महत्वपूर्ण भूमिका आणि कार्य आहे.

13) भारतीय संविधानाचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एकमेव शिल्पकार आहेत.

14) सन 1950 ते 1956 या सात वर्षाच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या अंमलबजावणीची समिक्षा केली आहे.

उपरोक्त गृहीतकाच्या आधारे भारताच्या घटनात्मक विकासातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका आणि कार्य या विषयाच्या संशोधन करुन निष्कर्ष नोंदविण्यात येणार आहेत.

4) संशोधन पद्धती :

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी ' ऐतिहासिक संशोधन' पद्धतीचा अवलंब करण्याचे योजीले आहे. ऐतिहासिक संशोधनामध्ये गतकालीन म्हणजेच भूतकालीन घटनांचे अध्ययन केले जाते. प्रस्तुत विषयामध्ये आधुनिक भारताच्या संविधानिक इतिहासाचे व त्यातील सन 1919 ते 1956 या कालखंडातील घटनांचे निरीक्षण व विश्लेषण करुन तत्कालीन समाज, विविध संस्था, चळवळी, व्यक्ती व त्यांची मते जाणून घेण्यात येणार आहेत. या कालखंडातील ऐतिहासिक घटनांचा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिका आणि कार्याचा अभ्यास करुन समाजाच्या वर्तमान पिढी समोर यथार्थ विश्लेषण व निर्वचन ठेवण्यात येणार आहे.

ऐतिहासिक संशोधनात घडलेल्या घटनेचा केवळ राजकीय इतिहास मांडल्या जात नाही तर समाजाच्या सांस्कृतिक, शैक्षणिक व धार्मिक अशा सर्वच अंगानी भूतकाळाची चिकित्सा केली जाते. ऐतिहासिक घटनांचे स्वरुप जर अस्पष्ट आणि गुंतागुंतीचे असेल तर ते चिकित्सेच्या माध्यमातून समजून घ्यावे लागते.

सन 1919 ते 1956 या 37 वर्षाच्या कालखंडात भारतात ज्या संविधानिक घटना घडल्या त्याचा अर्थ व अन्वायार्थ लावून वर्तमानकालीन संविधान व संविधानिक प्रश्न समजून घेणे तसेच भविष्यकालीन संविधानिक

विकासाची दिशा काय राहणार आहे याचा वेध हा ऐतिहासिक संशोधन पद्धतीद्वारेच घेतला जाऊ शकतो म्हणून प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धती वापरण्यात येणार आहे.

5) संशोधन आराखडा :

संशोधन आराखड्याचे सर्वसाधारण पणे खालील चार प्रकार प्रचलित आहेत.

1) अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा

2) वर्णनात्मक संशोधन आराखडा

3) निदानात्मक संशोधन आराखडा

4) प्रयोगात्मक संशोधन आराखडा

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखडा वापरण्यात येणार आहे. जेव्हा एखाद्या संशोधनात पूर्वी घडून गेलेल्या एखाद्या सामाजिक किंवा राजकीय घटनेतील अंतर्भूत असणाऱ्या कारणांचा शोध घेतला जातो तेव्हा अशा संशोधनासाठी तयार करण्यात येणाऱ्या संशोधन आराखड्यास अन्वेषणात्मक संशोधन आराखडा किंवा परिचयात्मक संशोधन आराखडा म्हणतात. या संशोधन आराखड्याद्वारे अज्ञात तथ्यांचा शोध आणि मर्यादीत माहिती व ज्ञानाच्या संदर्भात विस्तृत माहिती व ज्ञानाचा शोध घेतला जातो. अशा प्रकारे या आराखड्याचा उद्देश हा अज्ञात तथ्यांच्या शोध घेणे व मानवी ज्ञानाची वृद्धी करणे हा आहे. अन्वेषणात्मक अध्ययनासाठी आवश्यक ते ज्ञान उपलब्ध व्हावे म्हणून माहिती संकलित करण्यासाठी तीन पद्धती प्रचलित आहेत.

1) साहित्य सर्वेक्षण (Survey of Literature)

2) अनुभव सर्वेक्षण (Experience Survey)

3) अंतर्दृष्टीस प्रेरणा देणाऱ्या घटनाचे विश्लेषण

(Analysis of insiqht stiumulating)

उपरोक्त तीन पद्धतीपैकी पहिल्या दोन पद्धती प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन करण्यासाठी वापरण्यात येणार आहेत.

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी प्रश्नावली, सर्वेक्षण, मुलाखती ही तथ्य संकलनाची साधने वापरणे शक्य नाही. कारण सदर विषय हा इतिहासाचे पुनर्विश्लेषण करणारा, व ऐतिहासिक घटनांचे अन्वयार्थ लाऊन पुनः समालोचन करणारा आहे. त्यामुळे संदर्भवाचन पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. प्रस्तुत संशोधन विषय हा जवळपास शंभर वर्षापूर्वीचा असल्याने, त्यातील घटना प्रामुख्याने गोलमेज परिषदा व भारतीय संविधानिक सुधार संयुक्त समितीची कार्यवाही (1933) ही इंग्लंड मध्ये पार पडलेली असल्यामुळे त्यावरील संशोधनासाठी आज प्रश्नावली, सर्वेक्षण व मुलाखती ही संशोधनाची साधने वापरता येत नाहीत. यासाठी प्रथमदर्जाची आणि दुय्यम दर्जाची अभिलेख व लिखित संदर्भ ग्रंथाचे वाचन हिच पद्धत उपयोगी पडणार आहे. यासाठी सन 1919 पासुन आज 2017 पर्यंतच्या जवळपास शंभरवर्षात संविधानिक विकास प्रक्रियेबाबत लिहिण्यात आलेल्या मराठी, हिंदी व इंग्रजी ग्रंथ साहित्याचा शोध होऊन त्याची प्रकरण निहाय संदर्भ सूची तयार करुन संदर्भ ग्रंथाचे वाचन करुन त्यातून तथ्य संकलित करण्यात येणार आहेत.

6) संशोधन कार्यासाठी तथ्य संकलन :

सामाजिक संशोधक पी.व्ही. यंग यांच्या मते, संशोधनाचे अंतिम उद्दिष्ट हे सत्याचा शोध घेणे हे असून सत्याचा शोध हा वास्तविक तथ्यांच्या आधारावरच शक्य आहे. त्यामुळे तथ्यसंकलन हे संशोधन आराखड्यातील एक महत्वपूर्ण टप्पा आहे. सदर विषयाच्या संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही साधनांचा उपयोग करुन तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

अ) प्राथमिक स्त्रोत : ऐतिहासिक घटना घडत असताना प्रत्यक्ष साक्षीदार असलेल्या व्यक्तीने लिहून ठेवलेल्या, निर्माण केलेल्या किंवा तसल्याच इतर प्रकारच्या साधनांना प्राथमिक स्त्रोत किंवा प्रथमदर्जाची साधने म्हणतात. मुळ रेकॉर्डस् किंवा अवशेष (Remains) यांचा समावेश प्राथमिक स्त्रोतामध्ये केला जातो. सदर विषयाधिन संशोधनासाठी खालील प्राथमिक दर्जाची साधने वापरण्यात येणार आहेत.

1) भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालिन घटनांचा अभ्यास करुन लिहिलेले ग्रंथ

   1) पाकिस्तान अथवा भारताची फाळणी (1940)

   2) भाषिक राज्यासंबंधी विचार (1955)

   3) गांधी आणि अस्पृश्यजनांचे बंधविमोचन (1943)

   4) कॉंग्रेस आणि गांधी यांनी अस्पृश्यांसाठी काय केले (1945)

   5) संघराज्य विरुद्ध स्वातंत्र्य (1939)

   6) जातीय पेच आणि तो सोडविण्याचा मार्ग (1945)

   7) संस्थाने आणि अल्पसंख्याक (1947)

2) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संपादित केलेल्या पाक्षिक बहिष्कृत भारताचे अंक तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीचे मुखपत्र असलेल्या जनता पाक्षिकाचे अंक.

3) भारताचे पहिले प्रधानमंत्री व स्वातंत्र्य आंदोलनातील एक प्रमुख नेते पंडित जवाहरलाल नेहरु यांनी सन 1936 मध्ये लिहिलेले आत्मचरित्र 'आत्मकथा'

4) महात्मा गांधी यांनी सन 1927 मध्ये लिहिलेला ग्रंथ 'हिंद स्वराज '

5) संविधान सभेचे एक सन्मानीय सदस्य बी.शिवा राव यांनी इंग्रजी भाषेत संपादित केलेला दस्ताऐवजांचा खालील संग्रह

1) भारतीय संविधानाची रचनाः निवडक दस्ताऐवज खंड - एक (संविधानाची मागणी, संविधानसभा गठन)

2) भारतीय संविधानाची रचना : निवडक दस्तावेज खंड- दोन (समित्यांचे अहवाल)

3) भारतीय संविधानाची रचनाः निवडक दस्तावेज खंड- तीन (संविधानाचा मसुदा)

4) भारतीय संविधानाची रचना : निवडक दस्तावेज खंड- चार (मसुदा संविधानावरील सूचना)

5) भारतीय संविधानाची रचना : एक अभ्यास खंड- पाच

6) संविधानाच्या मसुदयावर संविधान सभेत झालेल्या चर्चाचे संसदेने संपादीत केलेल खंड - 1 ते 10

ब) द्वितीय स्त्रोत किंवा दुय्यम दर्जाची साधने :

घटना घडून गेल्यानंतर त्या घटने विषयी माहितीची विचारपुस करुन त्या घटने बद्दलचा तपशील नोंदविला जातो त्यास माहितीचा द्वितीय स्त्रोत किंवा दुय्यम दर्जाची साधने म्हणतात. सदर संशोधन कार्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विविध लेखकांनी लिहिलेले चरित्र, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, बॅरिस्टर जीना यांचे चरित्र, भारतीय संविधानावर लिहिलेले ग्रंथ, भारताच्या संविधानिक इतिहासावर लिहिलेले ग्रंथ,आधुनिक भारताच्या इतिहासावर लिहिलेले ग्रंथ इत्यादी संदर्भ ग्रंथाचा उपयोग प्रस्तुत संशोधनासाठी करण्यात येणार आहे.

7) अभ्यासाचे स्वरुपः सुक्ष्म आणि स्थूलस्तर :

प्रस्तावित संशोधन विषयाचा अभ्यास दोन पातळ्यावर करण्यात येणार आहे, एक सुक्ष्मस्तर (Microlevel) आणि दुसरा स्थूलस्तर (Macrolevel). प्रस्तुत संशोधनासाठी सन 1919 ते 1956 अशा 37 वर्षाच्या संविधानिक

विकासाच्या ऐतिहासिक घटनांचे तथ्य संकलित करण्यात येणार आहेत. याच काळतील घटनात्मक विकासाच्या प्रक्रियेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य आणि भूमिकांमध्ये काय योगदान आहे याचेही तथ्य संकलित करण्यात येणार आहेत. थोडक्यात प्रस्तुत संशोधन विषयासाठी भारताच्या संविधानिक विकासाच्या घटनाक्रमांचा स्थूलस्तरावर (Macrolevel) तर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या भूमिका आणि कार्याचा सूक्ष्म स्तरावर (Microlevel) अभ्यास करण्यात येणार आहे.

8) प्रकरण योजना :

प्रस्तुत संशोधन प्रबंध हा नऊ प्रकरणात विभागला असून प्रबंधाच्या स्वरुपाच्या आकलनास्तव प्रकरणाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

प्रकरण 1 : आधुनिक भारताच्या संविधानिक इतिहासाचा आढावा.

सदर प्रकरणात आधुनिक भारताच्या संविधानिक इतिहासाचा आढावा घेण्यात येईल. प्रामुख्याने ब्रिटिशांच्या राजवटीत करण्यात आलेल्या संविधानिक सुधारणांचा आढावा घेण्यात येईल. हा आढावा दोन टप्प्यात विभागला आहे. सन 1765 ते 1857 कंपनी सरकारची राजवट आणि सन 1858 ते 1909 ब्रिटिश साम्राज्याची राजवट अशा दोन टप्प्यात हा आढावा घेण्यात येईल. तपशील पुढील प्रमाणे आहे.

अ) सन 1765 ते 1857 ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीतील घटनात्मक कायदेः

1) रेग्युलेटींग ॲक्ट 1773

2) ॲक्ट ऑफ सेटलमेंट 1781

3) पिटस् इंडिया ॲक्ट 1784

4) चार्टर ॲक्ट 1813

5) चार्टर ॲक्ट 1833

6) चार्टर ॲक्ट 1853

ब) सन 1858 ते 1909 ब्रिटिश साम्राज्य राजवटी अंतर्गत घटनात्मक कायदे:

1) गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट 1858

2) इंडियन कॉन्सिल ॲक्ट 1861

3) इंडियन कॉन्सिल ॲक्ट 1892

4) इंडियन कॉन्सिल ॲक्ट 1909

उपरोक्त कायद्यांच्या तरतुदी, कायदा पास करण्यासाठी उद्‌भवलेली परिस्थिती, कायद्याची अंमलबजावणी या बाबत स्थूलस्तरावर अभ्यास करुन आढावा मांडण्यात येणार आहे.

प्रकरण 2 : सन 1919 ते 1929 दशकातील संविधानातील विकास

सदर प्रकरणात प्रामुख्याने सन 1919 ते 1929 या दहा वर्षातील संविधानिक सुधारणांचा आणि तत्कालिन विविध राष्ट्रीय नेत्यांच्या भूमिका आणि कार्याचा आढावा घेण्यात येणार असून प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिका आणि कार्याची चिकित्सात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. खालील घटनांचा सुक्ष्म व सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

1) मॉटेग्यु - चेम्सफोर्ड अहवाल 1918

2) साऊथबरो समिती - 1919

3) मुडीमन समिती - 1924

4) नेहरु समिती - 1928

5) सायमन कमिशन - 1929

प्रकरण 3 : गोलमेज परिषदा (1930-32) आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची भूमिका व कार्य

सदर प्रकरणात गोलमेज परिषदांच्या आयोजनाचा उद्देश परिषदांची कार्यवाही,यांचा सुक्ष्म आणि सखोल संशोधनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. गोलमेज परिषदांमध्ये सहभागी झालेल्या भारतीय नेत्यांच्या भूमिकांचा तौलानिक व चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे. प्रामुख्याने डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधीजी, आणि मुस्लीम लीगचे मोहम्मद अली जीना यांच्या भूमिका आणि कार्याचे अन्वेषण व विश्लेषण करण्यात येऊन निष्कर्ष नोंदविण्यात येणार आहेत.

गोलमेज परिषदांच्या कार्यवाहीचा संविधान निर्मितीमध्ये कसा आणि काय उपयोग झाला याचा अभ्यास करण्यात येणार आहे. गोलमेज परिषदांमध्ये नऊ समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या, या नऊ समित्यांचा कार्यवाहींचा आणि त्यातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याचा सूक्ष्म व सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 4 : जातीय निवाडा आणि पुणेकरार (1932)

सदर प्रकरणात ब्रिटिश सरकारने जाहिर केलेल्या जातीय निवाड्याचे स्वरुप काय होते ? या निवाड्यानुसार शीख, मुस्लीम व दलित यांना विधिमंडळातील प्रतिनिधीत्वासाठी कोणती पद्धत स्वीकारण्यात आली होती ? जातीय निवाड्यात स्त्रियांसाठी काय तरतुदी करण्यात आल्या होत्या ? जातीय निवाड्या बाबत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका काय होती ? या मुद्यांचा सखोल, विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. याशिवाय जातीय निवाडा आणि काँग्रेस व गांधीजींची भूमिका, जातीय निवाड्या बाबत मुस्लिम लीगची भूमिका याचाही सूक्ष्म आणि सखोल अन्वेषणात्मक अभ्यास करुन निष्कर्ष नोंदविण्यात येणार आहेत.

जातीय निवाड्यानुसार दलितांना मिळालेल्या स्वतंत्र मतदार संघाविरोधात गांधीजीनी उपोषण का केले ? गांधीजी आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकांच्या संघर्षा मागील अन्वयार्थ काय होता ? पुणे करार का करावा लागला ? पुणे करार शांतता, व सौहार्दतेच्या वातावरणात दोन्ही बाजू कडून स्वखुशीने समाधानकारक परिस्थितीत झाला की दबाव, धमक्या, अशांतता, बैचेनी व कटुतेच्या वातावरणात झाला ? पुणे कराराने सवर्ण हिंदूना काय मिळाले ? पुणे करार दलितांच्या हिताचा की अहिताचा ठरला? पुणे कराराचे समाजावर झालेले निष्ट व अनिष्ट परिणाम अभ्यासने हे या प्रकरणाचा प्रमुख उद्देश आहे.

प्रकरण 5: भारतीय संविधानिक सुधार संयुक्त समिती (1933) व 1935 चा कायदा

सदर प्रकरणात भारतीय संविधानिक सुधार संयुक्त समिती गठीत करण्याची कारणे, समितीची कार्यवाही याचा तपशीलासह अभ्यास करण्यात येणार आहे. सदर समिती मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या कार्याचा सखोल व चिकित्सात्मक अभ्यास करण्यात येणार आहे. 1935 च्या कायद्यातील तरतुदी आणि त्यानुसार भारतात झालेल्या शासकीय, प्रशासकीय व न्यायीक सुधारणा, या विषयी विश्लेषणात्मक मांडणी करण्यात येणार आहे. 1935 च्या कायद्यावर भारतीय नेत्यांच्या प्रतिक्रियांच्या अभ्यास करणे प्रामुख्याने महात्मा गांधीजी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व बॅ.जीना यांच्या भूमिकांचा तौलानिक व चिकित्सक दृष्टीने अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 6 : इ.स.1940 ते 1946 या कालावधीतील संविधानिक विकास

सदर प्रकरणात खालील महत्वपूर्ण ऐतिहासिक घटनांचा सूक्ष्म व सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

1) ऑगस्ट 1940 घोषणा
2) क्रिप्स मिशनची शिष्ठाई 1942
3) क्रिप्स मिशन अहवालावर काँग्रेस, मुस्लीम लीग, हिंदू महासभा व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिक्रिया
4) वेव्हेल योजना आणि सिमला परिषदा (1945)
5) कॅबिनेट मिशन (1946)
6) संविधान सभेसाठी निवडणुका (जुलै 1946)
7) माऊंटबॅटन योजना जून 1947
8) भारतीय स्वातंत्र्याचा कायदा 1947

या सर्व मुद्यांचा भारतीय घटनात्मक विकासावर झालेला परिणाम तसेच यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका व कार्य याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण 7: भारतीय संविधानाची निर्मिती (1947-1950)

सदर प्रकरणात भारतीय राज्यघटनेची निर्मिती प्रक्रिया, घटना समितीची रचना, घटना समितीच्या कामकाजाची पद्धत, घटना समितीच्या महत्वपूर्ण समित्या, त्यांचेकार्य व अहवाल, संविधान सभेतील चर्चा,भारतीय राज्यघटनेची उगमस्थाने, याचा सूक्ष्म व सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका व कार्याची चिकित्सा करण्यात येणार आहे.

प्रकरण 8 :भारतीय संविधानाची अंमलबजावणी (1950-56)

सदर प्रकरणात 26 जानेवारी 1950 पासून डिसेंबर 1956 पर्यंत सात वर्षात भारतीय राज्यघटनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यात येणार आहे. सदर सात वर्षामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय राज्यघटनेवर केलेल भाष्य व मिमांसेची चिकित्सा करण्यात येणार आहे. इस 1952 ते 1956 या पाच वर्षाच्या कालखंडात डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे राज्यसभेचे सन्मानीय सदस्य होते. या काळात त्यांनी राज्यसभेत केलेल्या भाषाणांचा सूक्ष्म व सखोल अभ्यास करण्यात येणार आहे. भारतीय संविधानाच्या भवितव्याबाबत बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले इशारे व खबरदाऱ्या याचा देखील अभ्यास करणे या प्रकरणात प्रस्तावित आहे.

प्रकरण 9 : विश्लेषण व निष्कर्ष

इतिहास संशोधनाचा अंतिम टप्पा हा विश्लेषणाचा पुनर्मूल्याकंनाचा व निष्कर्ष नोंदविण्याचा असतो. सदर संशोधनात संकलित केलेल्या तथ्यांच्या आधारे गृहीतकांची पडताळणी करुन निष्कर्ष काढण्यात येतील. प्रबंधात योग्य त्या ठिकाणी छयाचित्रे व परिशिष्ट्ये जोडले जातील.

9. संदर्भग्रंथची सूची

मराठी ग्रंथ :

1) कसबे रावसाहेब,'दलित चळवळीची वाटचाल' (प्रथमावृत्ती 1983) केशव गोरे, ट्रस्ट प्रकाशन, मुंबई.

2) कसबे रावसाहेब,'आंबेडकर आणि मार्क्स' (द्वितीय आवृत्ती -2006) सुगावा प्रकाशन,562 सदाशिव पेठ पुणे- 30

3) कसबे रावसाहेब, ' डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना. ' (तृत्तीय आवृत्ती -2001) सुगावा प्रकाशन 562,सदाशिव पेठ पुणे- 30

4) कांबळे बी.सी.,'समग्र आंबेडकर चरित्र खंड-सातवा' (द्वितीय आवृत्ती 2007) सुगावा प्रकाशन 562,सदाशिव पेठ पुणे- 30

5) कांबळे बी.सी., 'समग्र आंबेडकर चरित्र खंड-आठवा' (द्वितीय आवृत्ती 2007) सुगावा प्रकाशन 562,सदाशिव पेठ पुणे- 30

6) कांबळे एन.जी., 'पुणे करारः उज्ज्वल भविष्याचा प्रारंभ (प्रथमावृत्ती 2009) कौशल्या प्रकाशन, हडको औरंगाबाद -2

7) कीर धंनजय, 'यांनी इतिहास घडविला.' (दुसरी आवृत्ती -2013)
इंडिया प्रिटींग वर्क्स,वडाळा मुंबई - 440031.

8) कीर धनंजय,'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' (नववी आवृत्ती-1994) पॉप्युलर प्रकाशन, प्रा.लि. ताडदेव, मुंबई - 440034.

9) कीर धनंजय, 'विश्वभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर : मानस आणि तत्वविचार, ' पॉप्युलर प्रकाशन प्रा.लि. ताडदेव मुंबई 440034.

10) कुरुंदकर नरहर, 'आकलन' (दुसरी आवृत्ती -1998) देशमुख आणि कंपनी 473 सदाशिव पेठ पुणे-21

11) कुबेर वा.ना., 'डॉ.आंबेडकर:विचार मंथन, ' (तिसरी आवृत्ती) सुगावा प्रकाशन 861/1 सदाशिव पेठ, पुणे- 30

12) कुबेर वा.ना., 'भारताचा स्वातंत्र्य लढा- 1930-34 ' (प्रथमावृत्ती-2002) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई-14.

13) केळकर भा.कृ. 'भारतभूषण डॉ.बाबासाहेब आंबेडकर' (प्रथमावृत्ती1985) सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे- 30

14) खरात विलास (संपादीत) ' गांधीजी- एक दगाबाज व पाखंडी राजकारणी. मुलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट मंढवा पुणे- 36

15) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-4 (द्वितीय आवृत्ती -1989) सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे- 30

16) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-5 (द्वितीय आवृत्ती -1988) सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे- 30

17) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-6 व 7 (प्रथमावृत्ती 1985) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 32

18) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-8 (प्रथमावृत्ती 1983) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 32

19) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-9 (प्रथमावृत्ती 1983) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 32

20) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-10 (प्रथमावृत्ती 1989) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई 32

21) खैरमोडे चांगदेव भगवान, 'डॉ.भीमराव रामजी आंबेडकर खंड-11 (द्वितीय आवृत्ती 2000) सुगावा प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे- 30

22) गणवीर रत्नाकर,'आंबेडकर -गांधी: तीन मुलाखती' (द्वितीय आवृती-2005) नेहा प्रकाशन 120 गुरु नानकपुरा नागपूर - 17

23) गोखले द.न.डॉ.आंबेडकराचे अंतरग, (दुसरी आवृत्ती 2006) मौज प्रकाशन गृह मुंबई-4

24) गोखले द.नं. 'गांधीजी:मानव की महामानव ' (दुसरी आवृत्ती 2008) मौजे प्रकाशनगृह मुंबई - 4

25) गोडबोले वि.ज. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर:एक व्यक्ती-एक दृष्टी (दुसरी आवृत्ती-2001) दास्ताने रामचंद्र आणि कं.सदाशिव पेठ पुणे-30

26) ग्रोवर बी.एल.बेल्हेकर एन.के., 'आधुनिक भारताचा इतिहास' एस.चंद आणि कंपनी लि. रामनगर, नवी दिल्ली

27) जाधव श्रीराम, 'भारतीय राजकारण आणि डॉ.बाबासाहेब (1919-1931) (प्रथमावृत्ती-1995) ,साकेत प्रकाशन प्रा.लि.गांधीनगर,स्टेशन रोड औरंगाबाद.05

28) जाधव नरेंद्र, 'प्रज्ञा महामानवाची 'भाग एक ग्रंथली प्रकाशन दादर मुंबई-16.

29) जाधव नरेंद्र, 'प्रज्ञा महामानवाची 'भाग दोन ग्रंथली प्रकाशन दादर मुंबई-16.

30) जंजाळ प्रकाश, 'आंबेडकरी महायोद्धा:एन.शिवराज' (प्रथम आवृत्ती 2007) कौशल्या प्रकाश,एन11/सी-3/24/3 सिडको,औरंगाबाद -03

31) जावडेकर शं.द., 'आधुनिक भारत' (प्रथमावृत्ती-1938) कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर,पुणे-30

32) तळवलकर गोविंद, 'सत्तातंर:1947 खंड-1 (चौथी आवृत्ती-2011) मौज प्रकाशन गृह,खटाववाडी गिरगांव,मुंबई-4.

33) तळवलकर गोविंद, 'सत्तातंर:1947 खंड-2 (चौथी आवृत्ती-2011) मौज प्रकाशन गृह,खटाववाडी गिरगांव,मुंबई-4.

34) तळवलकर गोविंद, 'सत्तातंर:1947 खंड-3 (चौथी आवृत्ती-2011) मौज प्रकाशन गृह,खटाववाडी गिरगांव,मुंबई-4.

35) थोरात सी.पी.,'पुणे करारः काय कमावले,काय गमावले ?' सुमेध प्रकाशन केशवनगर,मुंढवा,पुणे. 36

36) नगरकर वसंत (अनुवाद:माधव लिमये),पाकिस्तानचे जन्म रहस्य (प्रथमावृत्ती-1988),महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई -1

37) निकम श्रीराम, ' गांधी-आंबेडकरःअस्पृश्यमुक्ती संघर्ष, (पहिली आवृत्ती 2008) लोकवाड्मय गृह प्रभादेवी मुंबई 25

38) नेहरु जवाहरलाल (अनुवाद ना.ग.गोरे) 'आत्मकथा' कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयानगर पुणे- 411030.

39) पंडितनलिनी,'आंबेडकर'(पहिली आवृत्ती 1995) ग्रंथाली प्रकाशन दादर मुंबई 16

40) पंडितनलिनी, 'गांधी' (तिसरी आवृत्ती 2006) ग्रंथाली प्रकाशन दादर -मुंबई 16.

41) पळशीकर वसंत (संपादक किशोर बेडकिहाळ) परिवर्तन विचार चिंतन आणि चिकित्सा (पहिली आवृत्ती 2013) लोकवाड्मय गृह-85 सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-25.

42) बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड-18 भाग-1 (1920-1936)

43) बाबासाहेब आंबेडकर,चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 18 भाग -2 (1937-1945)

44) बाबासाहेब आंबेडकर,चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 18 भाग -3 (1945-1967)

45) बाबासाहेब आंबेडकर,चरित्र साधने प्रकाशन समिती,उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग,महाराष्ट्र शासन प्रकाशित,डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड 22 (सचित्र ग्रंथ)

46) बिपिनचंद्र, मृदुला मुखर्जी व इतर (अनुवाद डॉ.एम.व्ही.काळे), इंडियाज स्ट्रगल फॉर इंडिपेंडस्, के सागर प्रकाशन,पुणे-30.

47) बिधुत चक्रवर्ती,राजेंद्र कुमार पांडे (अनुवाद चित्रा लेले) आधुनिक भारतीय राजकीय विचार:संहिता आणि संदर्भ (प्रधमावृत्ती 2001) डायमंड पब्लिकेशन, शनिवार पेठ पुणे -30.

48) भंडारे संजय आर, 'मानवतेचे निर्माते- डॉ.बाबासाहेब आंबेडकर, 'विनिमय पब्लिकेशनस् विक्रोळी (प) मुंबई-83.

49) भोळे भास्कर लक्ष्मण,'भारताचे शासन आणि राजकारण' (पाचवी आवृत्ती 2011) पिंपळापुरे ॲड कं.पब्लिशर्स, नागपूर-32.

50) मोरे शेषराव, 'काँग्रेसने आणि गांधीजीनी अखंड भारत का नाकारला ? ' राजहंस प्रकाशन,प्रा.लि. 1025, सदाशिव पेठ पुणे- 30.

ब) हिंदी ग्रंथ :

1) अग्रवाल आर.सी.डॉ.महेश भटनागर, 'भारतीय संविधान का विकास तथा राष्ट्रीय आंदोलन,' एस. चन्द एन्ड कंपनी, लि.रामनगर नई दिल्ली - 55.

2) डॉ.अंम्बेडकर प्रतिष्ठान, सामाजिक न्याय और अधिकारिता मंत्रालय,भारत सरकार नई दिल्ली - 110001 संपादीत और प्रकाशित 'डॉ.अम्बेडकर सम्पूर्ण वाड्मय खंड-5 (आठवाँ संस्करण : 2013)

3) कांशीराम, (अनुवादः रामगोपाळ आजाद), चमचा युग,समता प्रकाशन,लष्करी बाग,नागपूर- 440017.

4) बनौधा रामचंद्र, डॉ.अम्बेडकर का जीवन संघर्ष,आंनद साहित्य सदन,सिद्धार्थ मार्ग,छावणी-20 अलिगड (उ.प्र.)

5) बाली एल.आर.,'डॉ.अम्बेडकर जीवन और मिशन,भीमपत्रिका पब्लिकेशन, जालंधर,पंजाब

6) बाली एल.आर,'अम्बेडकर बनाम गाँधी, 'आंनद साहित्य सदन सिद्धार्थ मार्ग,छावनी - 20, अलिगड (उ.प्र.)

7) बौद्ध शीलप्रिय, 'पूना पॅक्ट क्यों.क्या, और किसके लिए ? ' (पंचम संस्करण : 2011) सम्य्क प्रकाशन,3213, पश्चिम पुरी, नई दिल्ली -110063.

8) शास्त्री शंकरानंद,'पुना पॅक्ट बनाम गॉधी, 'बहुजन कल्याण प्रकाशन, सआदत गंज, लखनऊ 3

9) शास्त्री शंकरानंद, 'युगपुरुष बाबासाहेब डॉ.भीमराव अम्बेडकरःजीवन संघर्ष एवं राष्ट्र सेवाएँ, (प्रथम संस्करण 1990) अमृत बुक कंपनी,एन 21,कनाट सर्कस,नई दिल्ली - 1

10) शुक्ल आर.एल. (संपादीत), 'आधुनिक भारत का इतिहास'हिंदी माध्यम कार्यान्वय निदेशालय, दिल्ली विश्वविद्यालय दिल्ली.

English Books:

1) B.Shivarao, (Editor), The Framing of India's Constitution, (Select Documents) vol. one.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
2) B.Shivarao, (Editor), The Framing of India's Constitution, (Select Documents) vol. Two.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
3) B.Shivarao, (Editor), The Framing of India's Constitution, (Select Documents) vol. Three.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
4) B.shivarao (Editor) The Framing of India's Constitution, (Select Documents) vol. Four.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
5) B.shivarao (Editor) The Framing of India's Constitution, (Select Documents) vol. Five.
Universal Law, Publishing Co, New Delhi, 02
6) Desai A.R,'Social Background of Indian Nationalism,' (Fith edition 1994) Popular Prakashan, Bombay
7) Dominique Lapierre &Larry Collins, 'Freedom at midnight (Reprint March 2011) vikas publing house pvt. Ltd. New Delhi-14.'
8) Gandhiji C.M.' Dr.B.R.Ambedkar & Women's Empo werment'(Edition2011) ABD publishers, Jaipur,Rajasthan
9) Gill S.S.,Gandhi : A sublime failure. (First edition 2001) Rupa Co.7/16 Ansari Road, Daryaganj New Delhi-2

10) Jain M.P., Outlines of Indian Legal & Constitutional History, (sixth Edition Reprint 2010)Lexis Nexis, Buttereworths Wadhwa, Nagpur.

11) Kuber W.N., Ambedkar : A criticalstudy, Peoples Publishing House, (p)ltd, Paharganj, New Delhi. 55

12) Kashyap subhash, constiturion making since 1950 vol. 6, Universal Law, Publishing co. New Delhi. 2

13) Mahajan V.D., Modern Indian History,s.chand & company pvt. Ltd, Ramnagar, New Delhi 55

14) Mane Suresh, Indian Constitutional Law, (Second Edition 2012) Arti & Company, 375-77 dariya bldg, gr. Floor D.N. Road, Mumbai 01

15) Mane Suresh, The Man who codified Indian Independence, (First Edition 2010) Bahujan Vartha, Gandhinagar, Kudavoor, p.o Thiravanathapuram, kerala

16) Mankar Vijay,Poona Pact : Historical Harms by Gandhi, Gandhism and Congress An Inquiry (Second Edition 2013) Blue world series Nagpur-27

17) Paranjape N.V., Indian Legal and Constitutional Histcry (Fourth edition reprint 1994) Central Law Agency , Allhahabad-2

18) Seervai H.M.,Constitutional Law of India, vol. no. 1 (Fourth Edition) Universal Law Publishing co.New Delhi 02

19) Sudipkar Purkayastha, On the Road of Freedom, part I (1877-1936) vist a publishing pvt. Ltd. 2/15, Ansari road, Daryaganj New Delhi, 02

20) Sudipkar Purkayastha, On the Road of Freedom, part II (1877-1936) vist a publishing pvt. Ltd. 2/15, Ansari road, Daryaganj New Delhi, 02

21) Vakil A.K,Gandhi - Ambedkar Dispute:an Analytical study, APH Publishing Corporation, 4435-36/7 Ansari road Daryagarij New Delhi -2

22) Vidyasagar I.S, Indian Freedom Movement and Dr. B.R. Ambedkar (Edition 2011) ABD publishers, Jaipur, Rajasthan (India)